| MHGA070005842022 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | २८.०६.२०२२ |
| नोंदणी तारीख | २८.०६.२०२२ |
| निकाल तारीख | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | **०३ वर्षे १० महिने ०७ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| **निशाणी –** | |
|---|---|
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **२३/२०२१ भामरागड** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **दि.०५.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २८२/२०२२** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे** ,<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, भामरागड, |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **१. नागेश आशदु तोगरवार,**<br>वय ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – भामरागड, ता.भामरागड, जिल्हा गडचिरोली.<br>**२. मंगरू बंडू मिच्चा,**<br>वय ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – भामरागड, ता.भामरागड, जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञ श्री.गणेश बोगामी**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०८.२०२१ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०४.०८.२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २८.०६.२०२२ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २८.०६.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०७.१०.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागेश आशदु तोगरवार | -- | २८.०६.२०२२ | म.प्र.का.चे कलम ६५(ई),८३ अन्वये | **निर्दोष** | – | – |
| २. | मंगरू बंडू मिच्चा | -- | २८.०६.२०२२ | म.प्र.का.चे कलम ६५(ई),८३ अन्वये | **निर्दोष** | – | – |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | प्रकाश वत्ते कुळयामी (**निशाणी २२**) | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | अतेश मोहनलाल मेश्राम (**निशाणी २५**) | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–२३**/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी **पी–२४**/स.सा.क्र.०१ | जप्ती नमुना |
| ३. | निशाणी **पी–२६** स.सा.क्र.०२ | फिर्याद |
| ४. | निशाणी **पी–२७**/स.सा.क्र.०२ | छापिल नमुन्यातील खबर |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २३/२०२१ | देशी दारू रॉकेट संत्रा कंपनीचे ९० एम एल मापाच्या ५३० निपा |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ०५ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०४.०८.२०२१ रोजी सायंकाळी ०५.४० ते ०६.३० वाजताच्या सुमारास मौजा भमारागड, तह. भमारागड, जि. गडचिरोली येथे आरोपी क्र.१ व २ हे देशी दारू रॉकेट संत्रा कंपनीच्या ९० मिली मापाच्या ५३० निपा दारू विक्री करण्याकरिता मिळुन आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले

आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.१४ खाली नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.०४.०८.२०२१ रोजी सायंकाळी ०५.४० ते ०६.३० वाजताच्या सुमारास मौजा भमारागड, तह. भमारागड, जि. गडचिरोली येथे आरोपी हे देशी दारू रॉकेट संत्रा कंपनीच्या ९० मिली मापाच्या ५३० निपा विक्री करण्याकरिता मिळुन आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः**

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले.

३. सा.क्र.१ **प्रकाश कुळयामी** (पंच) यांनी त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०४.०८.२०२१ रोजी च्या घटनेसंदर्भात पोलिसांनी त्यांना पोलिस स्टेशन येथे बोलवले होते. आरोपीकडून देशी दारूच्या सुमारे तिनशे बाटल्या जप्त केल्या होत्या. पोलीसांनी त्यांची पंच म्हणुन सही घेली होती. घटनास्थळ जप्ती पंचनामा नि.क्र.२३ आणि जप्तीचा नमुना नि.क्र.२४ वर त्यांचे सहया आहेत व त्यातील मजकुर बरोबर आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष न लिहीता आधीच पंचनामा लिहून तयार केला होता. पोलीसांनी पंच म्हणुन सही करायला सांगीतल्यावर त्यांनी न वाचता सही केली होती. नक्की किती बाटल्या होत्या हे त्यांना माहिती नाही. त्यांना ईतर कामासाठी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. त्यांच्यासमक्ष पंचनामा तयार केला नव्हता.

३. सा.क्र.२ **अतेश मेश्राम** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०४.०८.२०२१ रोजी ते भामरागड पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांना मुखबिराकडुन माहिती मिळाली की, मौजा भामरागड येथे वार्ड क्र.६ येथे आरोपी दारू बाळगुन विक्री करित असल्याची माहिती मिळाल्याने ते व इतर पोलीस कर्मचारी व पंचासह तिथे गेले. आरोपीच्या सांदवाडीत देशी दारू रॉकेट संत्रा कंपनीच्या ९० मिली मापाच्या ५३० बॉटला मिळून आल्या.त्यानंतर त्यांनी तो माल व आरोपीला पोलीस ठाण्यात आणले. पोलीस ठाण्यात पंचासमक्ष ताब्यातील प्रत्येकी एक नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता काढणयत आला. तो त्यांनी पोलीस ठाण्यात जमा केला. त्यांनी फिर्याद नि.क्र.२६ व छापिल नमुन्यातील खबर नि.क्र.२७ दिली असुन त्यावर त्यांच्या सह्या असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, पंचाना सुचनापत्र देवून बोलाविले होते. त्यांनी सर्व कागदपत्र पोलीस ठाण्यातच तयार केले. विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

६. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले तसेच फिर्यादी हे पोलिस कर्मचारी आहे. जोपर्यंत त्यांचे साक्षेला इतर स्वतंत्र साक्षीदार दुजोरा करत नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. पंच साक्षीदार क्र.१ हा अभियोग पक्षाला सहाकार्य करित नाही. सदर प्रकरणात देशी दारू असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपींविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपींविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१

ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र. २ करिताः**

८. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

१. आरोपी क्र.१ **नागेश आशदु तोगरवार** व आरोपी क्र.२ **मंगरू बंडू मिचा,** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई),८३ नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपींचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी प्रत्येकी रूपये २५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४५२ नुसार असे आदेशित करण्यात येते की, अपिल कालावधीनंतर यातील जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट राज्य उत्पादन शुल्क विभाग गडचिरोली यांनी लावावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.05 17:07:49 +0530

(एस.एम.एच.शाहिद)

दि.०५.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी